सहकार आयुक्त व निबंधक,
सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य,पुणे यांचे कार्यालय,
नविन मध्यवर्ती इमारत,दुसरा मजला,पुणे-४११ ००१

दुरध्वनी क्र.:२६१२२८४६/४७ Email - commcoop२०११ @ gmail.com

२५८-जा.क्र.८-सआ/वैधा.कार्य व अवसा.काम/क.१०२ व क.११० (अ) अवपॅ/२०१८ दिनांक:०५/१०/२०१८

प्रति,

विभागीय सहनिबंधक,
सहकारी संस्था,(प्रशासन सर्व)

**विषय :- महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०२ व कलम ११० (अ) अन्वये अवसायक नियुक्तीसाठी अवसायकांचे पॅनेल बाबत.**

उपरोक्त विषयाबाबत कळविण्यात येते की, राज्यातील अवसायनात घेण्यात येणा-या संस्थांवर अवसायकाची नियुक्ती करण्याची तरतुद महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०२ व कलम ११० (अ) मध्ये नमूद आहे.माहे जुन,२०१८,अखेर राज्यामध्ये अवसायनात असलेल्या सहकारी संस्थांचा तपशील खालीलप्रमाणे-

| अ.क्र. | विभागाचे नाव | अवसायनातील संस्थांची संख्या |
|---|---|---|
| १ | मुंबई | ४२७ |
| २ | कोकण | ३४१ |
| ३ | नाशिक | ४११८ |
| ४ | पुणे | ३५५८ |
| ५ | कोल्हापूर | २२१५ |
| ६ | औरंगाबाद | १५९७ |
| ७ | लातूर | २२३९ |
| ८ | अमरावती | ११२६ |
| ९ | नागपूर | १५६७ |
| १० | एकुण | **१७१८८** |

वरीलप्रमाणे अवसायनात घेण्यात आलेल्या संस्थांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे.त्याचप्रमाणे राज्यातील सहकार विभागातील अधिकारी/कर्मचारी यांचेकडे सहकारी संस्थांच्या निवडणूका,कलम ८३ व कलम ८८ अन्वये चौकशीचे कामकाज, कलम ८९ ए अन्वये तपासणीचे कामकाज, प्रशासक व अवसायक म्हणुन कामकाज, कर्जमाफी इ. व अन्य अनुषांगीक कामकाजाचा मोठा भार आहे.विभागातील अधिकारी / कर्मचारी यांची पदे मोठ्या प्रमाणात रिक्त आहेत.सहकारी संस्थांवर अवसायक म्हणून नियुक्ती केलेनंतर विभागातील अधिकारी यांना त्यांचे स्वतःचे वरीलप्रमाणे कामकाज सांभाळून सहकारी संस्थांचे अवसायनाचे कामकाज करणे जिकीरीचे होत आहे. सहकारी संस्थांचे अवसायनाचे कामकाज कलम १०९ नुसार १० वर्षात पूर्ण करणे बंधनकारक आहे.परंतु उपरोक्त प्रमाणे कामकाजाचे व्यापामुळे खात्यातील अधिकारी/ कर्मचारी यांना अवसायनाचे कामकाज विहीत मुदतीत पूर्ण करणे शक्य होत नाही.

Scanned by CamScanner

२.उपरोक्त वस्तुस्थिती लक्षात घेता सहकारी संस्थांवर अवसायक म्हणून नियुक्ती करावयाच्या अशासकीय व्यक्तिंचे पॅनल तयार करणे आवश्यक आहे.अवसायकांचे पॅनल तयार केलेमुळे अवसायन कामकाजासाठी पुरेशा प्रमाणात अवसायक उपलब्ध होतील. संस्थेस स्वतंत्र अवसायक नियुक्त केलेमुळे अवसायकास पूर्ण वेळ कामकाज करता येईल. त्यामुळे विहीत मुदतीत अवसायनाचे कामकाज पूर्ण होण्यास मदत होईल.

**३.अशा प्रकारे नियुक्त करावयाच्या पॅनेल वर खालीलप्रमाणे व्यक्तिंचा समावेश असेल -**

i. न्यायालयातील निवृत्त न्यायाधीश व सेवानिवृत्त विधी अधिकारी

ii. प्रॅक्टीसिंग अॅडव्होकेटस्

iii. चार्टर्ड अकौन्टंट,कॉस्ट अकौन्टंट,कंपनी सेक्रेटरी

iv. राष्ट्रीयीकृत बँका, ग्रामीण बँका, भूविकास बँका, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, व्यापारी बँका, नागरी सहकारी बँका, राज्य सहकारी बँक यांचे सेवेतील व्यवस्थापक दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेले सेवानिवृत्त अधिकारी.

v. सहकार विभागातील सेवानिवृत्त वर्ग-१, वर्ग-२ दर्जाचे अधिकारी आणि प्रथम श्रेणी व व्दितीय श्रेणी दर्जाचे कर्मचारी.

vi. महसुल विभागातील सेवानिवृत्त उपजिल्हाधिकारी दर्जाचे अधिकारी

vii. कंपनी लिक्विडेटर म्हणून कामकाज केलेले अनुभवी व्यक्ती.

viii. सहकारी संस्थेचे लेखापरिक्षण केले असल्याचे १० वर्षाचे अनुभवी प्रमाणित लेखापरिक्षक.

**तसेच अशा व्यक्तींची नियुक्ती करताना खालीलप्रमाणे अर्हता/पात्रता असणे आवश्यक आहे-**

१. सदर व्यक्तीवर कोणत्याही स्वरूपाचे गुन्हे दाखल नसावेत.

२ शासकीय सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी असल्यास त्यांची कोणत्याही प्रकारची खातेनिहाय चौकशी चालू नसावी व सेवेत कोणताही ठपका ठेवलेला नसावा.

३. वयोमर्यादा ७० वर्षापर्यंत असावी.

४. शारीरीक व मानसिक आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा.

५. प्रॅक्टीसिंग अॅडव्होकेटस् व चार्टर्ड अकौन्टंट,कॉस्ट अकौन्टंट,कंपनी सेक्रेटरी यांना सहकारी संस्थेचे कामकाजाचा ०५ वर्षाचे अनुभव असणे आवश्यक आहे.

**६.कोणत्याही सहकारी संस्थेचा थकबाकीदार नसावा किंवा कलम ८३ व कलम ८८ च्या चौकशीबाबत जबाबदार नसावा.**

**७.सदर व्यक्ती कोणत्याही काळ्या यादी (Black List) मध्ये समाविष्ट नसावी.**

Scanned by CamScanner

४.सदरची नामीका विभाग व राज्यस्तरावर तयार करण्यात यावी. याबाबत विभागीय सहनिबंधक यांनी विभागस्तरावर कार्यवाही करावयाची आहे. त्यासाठीचे वेळापत्रक पुढीलप्रमाणे राहील-

नामीका तयार करणेबाबतचे वेळापत्रक

| अ.क्र. | तपशील | दिनांक |
|---|---|---|
| १ | जाहीरात प्रसिध्द करणे | १५/१०/२०१८ |
| २ | अर्ज सादर करणेची अंतीम मुदत | ३०/१०/२०१८ |
| ३ | अर्जाची छाननी | १३/११/२०१८ |
| ४ | प्रारूप नामीका प्रसिध्द करणे व त्यावर हरकती मागविणे व निर्णय करणे | १७/११/२०१८ |
| ५ | अंतीम नामीका प्रसिध्द करणे | ३०/११/२०१८ |

५.विभागीय सहनिबंधक यांनी विभागाची नामीकेची सॉफ्ट कॉपी व हार्ड कॉपी दिनांक ०७/१२/२०१८ पर्यंत सहकार आयुक्त कार्यालयास सादर करावी.

**सोबत : जाहीर निवेदन**

(सतिश सोनी)
सहकार आयुक्त व निबंधक
सहकारी संस्था,महाराष्ट्र राज्य,पुणे.

Scanned by CamScanner

# जाहीर निवेदन

विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था ------------------ याँचे मार्फत कळविण्यात येते की. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०२ व कलम ११० (अ) अन्वये विभागातील अवसायनातील संस्थांचे कामकाजासाठी अवसायकांची नामतालिका (पॅनेल) तयार करण्यासाठी खालील व्यक्तिंकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

i न्यायालयातील निवृत्त न्यायाधीश व सेवानिवृत्त विधी अधिकारी
ii प्रॅक्टीसिंग ॲडव्होकेटस्
iii चार्टर्ड अकौन्टंट.कॉस्ट अकौन्टंट.कंपनी सेक्रेटरी
iv राष्ट्रीयीकृत बँका, ग्रामीण बँका, भूविकास बँका, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, व्यापारी बँका नागरी सहकारी बँका, राज्य सहकारी बँक यांचे सेवेतील व्यवस्थापक दर्जापेक्षा कनिष्ठ नसलेले सेवानिवृत्त अधिकारी.
v सहकार विभागातील सेवानिवृत्त वर्ग-१,वर्ग-२ दर्जाचे अधिकारी आणि सहकार अधिकारी प्रथम श्रेणी व व्दितीय श्रेणी दर्जाचे कर्मचारी.
vi महसुल विभागातील सेवानिवृत्त उपजिल्हाधिकारी दर्जाचे अधिकारी
vii कंपनी लिक्विडेटर म्हणून कामकाज केलेले अनुभवी व्यक्ती.
viii सहकारी संस्थेचे लेखापरिक्षण केले असल्याचे १० वर्षाचे अनुभवी प्रमाणित लेखापरिक्षक

**अर्जदार व्यक्तींनी खालीलप्रमाणे अर्हता धारण केलेली असावी :-**

१. सदर व्यक्तीवर कोणत्याही स्वरूपाचे गुन्हे दाखल नसावेत.
२ शासकीय सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी असल्यास त्यांची कोणत्याही प्रकारची खातेनिहाय चौकशी चालू नसावी व सेवेत कोणताही ठपका ठेवलेला नसावा.
३. वयोमर्यादा ७० वर्षा पर्यंत असावी.
४. शारीरीक व मानसिक आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा.
५. प्रॅक्टीसिंग ॲडव्होकेटस् व चार्टर्ड अकौन्टंट,कॉस्ट अकौन्टंट,कंपनी सेक्रेटरी यांना सहकारी क्षेत्रात कामकाजाचा ०५ वर्षाचे अनुभव असणे आवश्यक आहे.
६. कोणत्याही सहकारी संस्थेचा थकबाकीदार नसावा किंवा कलम ८३ व कलम ८८ च्या कार्यवाहीमध्ये जबाबदार धरलेला नसावा.(महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व त्याखालील नियमातील अपात्र नसावा.)
७. सदर व्यक्तीचा सहकार खात्याने काळ्या यादी मध्ये (Black List) समावेश केलेला नसावा.
८. सदर व्यक्ती संबंधीत विभागाच्या विभागीय सहनिबंधक,सहकारी संस्था,कार्यालयाच्या अधिपत्याखाली येणा-या जिल्ह्यातील रहिवासी असावी.
९. सदर व्यक्ती एकावेळी एकाच जिल्ह्यातून अर्ज दाखल करू शकेल.

अर्जाचे विहीत नमुने विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था------------------ विभाग----------- पत्ता ------------------------------------------------------ यांचे कार्यालयात दिनांक १५/१०/२०१८ ते ३०/१०/२०१८ या कालावधीत कार्यालयीन वेळेत मिळू शकतील.अर्ज सादर करण्याची अंतीम मुदत दिनांक ३०/१०/२०१८ पर्यंत राहील. प्राप्त अर्जाची छाननी दिनांक १३/११/२०१८ रोजी पूर्ण करून, दिनांक १७/११/२०१८ पर्यंत प्रारूप नामिका प्रसिध्द करणे व त्यावर हरकती मागवूणे व निर्णय घेणेस येईल. हरकतीचा निर्णय करुन दिनांक ३०/११/२०१८ रोजी अंतीम नामीका प्रसिध्द करण्यात येईल. यावाबतची जाहीर सूचना या कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

विभागीय सहनिबंधक,
सहकारी संस्था-.....

Scanned by CamScanner

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०२/ कलम ११० (अे) अन्वयं अवसायन कामकाजासाठी अवसायकांच्या नामतालिकेवर नेमणूक होण्यासाठीचा अर्ज.

प्रति,

विभागीय सहनिबंधक,
सहकारी संस्था-----------

विषय :- महाराष्ट्र सहकारी संसथा अधिनियम १९६० चे कलम १०२/ कलम ११० (अे) अन्वये अवसायन कामकाजासाठी अवसायकांचे नामतालिकेवर (पॅनेल) वर नेमणूक होणेबाबत

संदर्भ :- दै. ........................................ मधील दिनांक ......................... रोजीची जाहिरात.

उपरोक्त विषयास अनुसरून सादर करण्यात येते की, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०२/ कलम ११० (अे) अन्वये अवसायन कामकाजासाठी अवसायकांचे नामतालिकेवर माझी नेमणूक होण्याकरीता माझी वैयक्तीक माहिती खालील प्रमाणे :-

१) अर्जदाराचे नाव :- ---------------------------------------------------------------------------
(आडनाव) (नाव) (वडीलांचे / पतीचे नाव)

२) कायम पत्ता : ---------------------------------------------------------------------------

संपर्कासाठी पत्ता ---------------------------------------------------------------------------

(कायम पत्यापेक्षा वेगळा असेल तर)------------------------------------------------------------

३) जन्म तारीख :- ---------------------------------------------------------------------------

४) शैक्षणिक पात्रता:- ---------------------------------------------------------------------------

५) दूरध्वनी क्रमांक :---------------------------६) भ्रमणध्वनी क्रमांक :- ----------------------

७) ई मेल आयडी :------------------------------------ ---------------------------------------

८) आधार कार्ड क्रमांक :---------------------------------------------------------------------

९) पॅनकार्ड क्रमांक:---------------------------------------------------------------------------

१०) अर्जदार हा:-

**अ) सेवानिवृत्त अधिकारी असल्यास :-** (न्यायालयातील निवृत्त न्यायाधीश व सेवानिवृत्त विधी अधिकारी,सहकार विभागातील सेवानिवृत्त वर्ग-१,वर्ग-२ दर्जाचे अधिकारी आणि सहकार अधिकारी, प्रथम श्रेणी व व्दितीय श्रेणी दर्जाचे सेवानिवृत्त अधिकारी, महसुल विभागातील सेवानिवृत्त उपजिल्हाधिकारी दर्जाचे अधिकारी, राष्ट्रीयकृत बँका, ग्रामीण बँका, भूविकास बँका, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, व्यापारी बँका, नागरी सहकारी बँका, राज्य सहकारी बँक यांचे सेवेतील व्यवस्थापक दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेले सेवानिवृत्त अधिकारी असल्यास)

i) नियतवयोमानान्वये/ऐच्छिक सेवानिवृत्तीचा दिनांक :------------------------------------------

ii) निवृत्ती वेळी धारण केलेले पद व कार्यालय :-----------------------------------------------

Scanned by CamScanner

iii) सेवानिवृत्ती आदेश जावक क्र.व दिनांक:--------------------------------------------------------------------

ब) प्रॅक्टीसिंग ॲडव्होकेटस् असल्यास :-

i) शैक्षणिक अर्हता:- --------------------------------------------------------------------------------

ii) (सनद) बार कौन्सील येथे नोंदणीचा क्रमांक व दिनांक :- --------------------------------------------

फ) कंपनी लिक्वीडेटर असल्यास :-

i) कंपनीचे नाव :-------------------------------------------------------------------------------------

ii) लिक्वीडेटर म्हणून कामकाज करीत असल्याचा दिनांक :-----------व कालावधी--------वर्षे------

iii) कंपनी लिक्वीडेटर म्हणुन नियुक्तीच्या आदेशाचा सक्षम प्राधिका-याकडील क्रमांक व दिनांक------

ड) प्रमाणित लेखापरिक्षक असल्यास :-

i) नामिकेवरील अनुक्रमांक: --------------------------------------------------------------------------

ii) मागील १० वर्षातील लेखापरिक्षण केलेल्या संस्थांचे प्रमाणपत्र ----------------------------------

११) सहकारी संस्थेच्या कामकाजाचा अनुभव :- ----------------------------------------------------

| अ.क्र. | संस्थेचे नांव | कामकाजाचे स्वरुप | अनुभवाचा कालावधी (वर्ष) |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |

१२) अवसायक/प्रशासक कामकाजाचा अनुभव

| अ.क्र. | कलम १०२/ कलम ११० (अ) अन्वये आदेश | अवसायक/प्रशासक म्हणून कामकाज केलेल्या संस्थेचे नांव व पत्ता | कालावधी |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |

१३) अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे :-

i) शैक्षणिक अर्हता : पदवी प्रमाणपत्र/व्यवसायीक अभ्यासक्रम प्रमाणपत्र

ii) जन्म दिनांक प्रमाणपत्र

iii) आधार कार्ड

iv) पॅन कार्ड

v) रहिवासाचा पुरावा ( टेलिफोन बील/लाईट बील/प्रॉपर्टी टॅक्स/मतदान कार्ड इ.)

vi) सेवानिवृत्तीचा आदेश

vii) सनद (बार कौन्सील) चार्टर्ड अकौंन्टंट, कॉस्ट अकौंन्टंट यांचे सक्षम प्राधिका-याकडील नोंदणीचे

Scanned by CamScanner

प्रमाणपत्र/कंपनी लिक्वीडेटर/प्रमाणित लेखापरिक्षक यांची नामिकेची प्रत)

viii) अनुभवाचे पृष्ठ्यर्थ :- नियुक्तीचे आदेश

ix) सर्व माहीती व विवरण सत्य व अचुक असल्याचे प्रतिज्ञापत्र

## स्वयंघोषीत प्रतिज्ञापत्र

मी.------------------------------------------------------------------- न्यायालयातील सेवानिवृत्त न्यायाधीश/सेवानिवृत्त विधी अधिकारी/सहकार विभागातील सेवानिवृत्त वर्ग-१,वर्ग/ वर्ग-२ दर्जाचे अधिकारी/सहकार अधिकारी प्रथम श्रेणी /व्दितीय श्रेणी दर्जाचे संवानिवृत्त अधिकारी/महसुल विभागातील सेवानिवृत्त उपजिल्हाधिकारी दर्जाचे अधिकारी/ राष्ट्रीयीकृत बँका/ ग्रामीण बँका/भुविकास बँका/जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका/ व्यापारी बँका/ नागरी सहकारी बँका/ राज्य सहकारी बँक यांचे सेवेतील व्यवस्थापक दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेले सेवानिवृत्त अधिकारी वय---------राहणार ----------------प्रतिज्ञापत्र लिहुन देतो की,मी------------------परिक्षा ------------या दिनांकास उत्तिर्ण असून आत्तापर्यंत मला --------वर्षाचा सहकारी संस्थांच्या कामकाजाचा अनभुव आहे.

अवसायक नामिकेसाठी करावयाच्या अर्जासोबतचे प्रतिज्ञापत्र नमूना

| अ.क्र. | वर्ष | संस्थेचे नाव | लेखापरिक्षणाचा प्रकार (वार्षिक,चाचणी,फेरलेखापरिक्षण,परिव्यय व मुल्य (performance) ) |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |

१. माझ्यावर कोणत्याही स्वरूपाचे गुन्हे दाखल नाहीत.

२ मी शासकीय सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी असुन माझी कोणत्याही प्रकारची खातेनिहाय चौकशी चालू नाही सेवेत माझ्यावर कोणताही ठपका टेवलेला नाही.

३. माझे वय ७० वर्षाच्या आत आहे.

४. मी शारीरीक व मानसिक आरोग्याच्या दृष्टीने सक्षम आहे.

५. प्रॅक्टीसिंग अॅडव्होकेटस् व चार्टर्ड अकौंन्टंट,कॉस्ट अकौंन्टंट,कंपनी सेक्रेटरी यापैकी मी ------ असुन मला सहकारी संस्थेच्या कामकाजाचा ०५ वर्षाचा अनुभव आहे.

६. मी कोणत्याही सहकारी संस्थेचा थकबाकीदार नाही किंवा कलम ८३ व ८८ च्या कार्यवाहीमध्ये मला जबाबदार धरलेले नाही.( मी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व त्याखालील नियमांतर्गत पात्र आहे.)

७. माझा सहकार खात्याने काळया यादी मध्ये (Black List) समावेश केलेला नाही.

८. मी संबंधीत विभागाच्या विभागीय सहनिबंधक,सहकारी संस्था,कार्यालयाच्या अधिपत्याखाली येणा-या ----------- या जिल्ह्यातील रहिवासी आहे.

९. मी ज्या संस्थेचे अवसायक म्हणून काम करेल, त्या संस्थेशी माझे हितसंबंध असणार नाहीत.

वरील अवसायक नामिकेसाठी स्वयंघोषीत प्रतिज्ञापनातील १ ते ९ मुद्दे हे सत्य असुन त्यामध्ये काही खोटे आढळल्यास होणा-या परिणामास व कारवाईस मी (खाली सही करणार) पात्र राहील.

स्थळ :-------------------

दिनांक :------------------

अर्जदाराची स्वाक्षरी :- -------------

नांव :---------------

(अर्जासोबत अर्हतेमध्ये नमूद केल्याप्रमाणे आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रती जोडण्यात याव्यात)

Scanned by CamScanner